# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २४/०५/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ

---

### पोस्टे केळवद हद्दीतील छत्रापुर खदान अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

दिनांक २३/०५/२०२४ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे परिसरात प्रोव्हिशन रेडकामी फिरत असताना मुखबिर कडुन विश्वसनिय खबर मिळाली कि, छत्रापुर खदान येथे १ इसम मोहाफुल हातभट्टी ची दारु गाळत आहे. अशा खबरे वरुन छत्रापुर खदान मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारी **महिला आरोपी** ही अवैधरीत्या हातभट्टी लावुन मोहाफुल गावठी दारू काढतांना दिसुन आली. दगड विटांचे चुलीवर लोखंडी ड्रम ठेवुन नळी द्वारे मोहाफुल गावठी दारुची रनिंग भट्टी काढतांना आढळुन आली. आरोपीचे ताब्यातून १) ३ निळया रंगाच्या ड्रम मध्ये प्रत्येकी २०० लिटर मोहाफुल रसायन सडवा असा एकुन ६०० लिटर प्रती लिटर २०/—रुपये असा एकुन १२,०००/— रुपये २) १ काळया रंगाच्या रबरी ट्युबमध्ये ४० लिटर तयार मोहाफुल गावठी दारु प्रती ५०/— रुपये लीटर प्रमाने एकुन किंमती २०००/— रुपये ३) २० किलो ग्राम मोहाफुल प्रत्येकी ५०/— रुपये किलो असे एकुन १,०००/— रुपये ४) २ निळया रंगाचे खाली ड्रम प्रत्येकी किंमत १०००/—रुपये प्रमाने असे एकुन किंमत २,०००/— रुपये ५) २ नग लोखंडी ड्रम मध्ये उकळलेले मोहाफुल रसायनने भरलेले प्रत्येकी १०० लिटर एकूण २०० लिटर प्रती लिटर २०/— रुपये असा एकुन ४०००/— रुपये ६) १ नग लोखंडी खाली ड्रम प्रत्येकी किमत १२००/—रुपये ७) १ टन जळाउ लाखड कि २५००/—रुपये ८) ईतर दारु गाळण्याचे साहीत्य पाईप, जर्मन घमीला ईतर साहीत्य एकुन किमंत ५,०००/—रुपये असा एकुण २९,७००/— रुपयाचा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपी विरुद्ध पो.स्टे केळवद येथे कलम ६५ (एफ), (सी), (ई), (ब) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद येथील ठाणेदार राकेश साखरकर, पोउपनि विलास गेडाम, सफौ किशोर ठाकरे, पोहवा मंगेश धारपुरे, पोशि धोंडुतात्या देवकते, सैफुल्ला खलील अहमद यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर